# मोटार अपघात दावा अर्ज क्र.५६/२०१९ मधील नि.६ खालील आदेश

CNR No. MHST01-000918-2019

अर्जदार यांनी नुकसान भरपाई मिळण्यासाठी मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम १६६ नुसार केलेल्या मुख्य अर्जात या अर्जाद्वारे त्या अधिनियमाखालील कलम १४० नुसार अंतरिम नुकसान भरपाई मिळण्याची मागणी केलेली आहे.

२. अर्जदार प्रसाद नंदकुमार यादव, वय–२२ वर्षे, धंदा–शिक्षण व शेती, रा. मु.पो. करंजखोप, ता. कोरेगांव, जि. सातारा याचे कथनानुसार दि.१६/१२/२०१७ रोजी सायंकाळी ०७.४५ वाजताचे सुमारास पिंपोडे बु।। ते भावेनगर रस्त्यावर कांबळे इंग्लीश स्कूलजवळ अर्जदार हा स्प्लेंडर मोटार सायकल क्र.एम.एच.११/बी.आर.२०७९ वरुन जात असता, सामनेवाला याने त्याच्या मालकीची मोटार सायकल क्र. एम.एच.११/बी.एक्स.७८०१ ही निष्काळजीपणे, भरधाव वेगात चालवून, चुकीच्या बाजूने येवून अर्जदार प्रवास करीत असलेल्या उपरोक्त मोटार सायकलला धडक दिली आणि त्या अपघातामध्ये अर्जदार गंभिररित्या जखमी होवून त्याला कायमस्वरुपी अपंगत्व आले. अपघाताचे वेळी सदर मोटार सायकल क्र. एम.एच.११/बी.एक्स.७८०१ सामनेवाला याच्या मालकीची होती आणि या वाहनाचा विमा उतरविलेला नसल्याने सामनेवाला हा नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहे.

३. सामनेवाला याने म्हणणे दिले नाही..

४. अर्जदाराने यादी नि.४ सोबत हजर केलेले अपघातासंबंधीचे वाठार पोलीस स्टेशन मधील दि.२१/१२/२०१७ रोजी नोंदविलेल्या अपराध क्र.२२५/२०१७ मधील प्रथम वर्दि अहवाल, घटनास्थळ पंचनामा यावरुन अर्जदाराच्या कथनाप्रमाणे वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी अपघात झाल्याचे आणि सदरहू वाहन त्या अपघातात सामील असल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट होते.

५. अर्जदारातर्फे हजर केलेल्या वैद्यकीय कागदपत्रांवरुन असे स्पष्ट होते की, अर्जदाराने साईमुर्ती मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल, सातारा येथे अपघातातून उद्भवलेल्या विविध जखमा आणि भंग पावलेल्या हाडांसाठी उपचार घेतलेले आहेत. डॉ.एस.एम.बर्गे यांनी सदरहू विविध जखमांमुळे अर्जदारास २० टक्के पर्यंत कायम स्वरुपी अपंगत्व आल्याचे प्रमाणित केले आहे. वरील सर्व परिस्थितीत अर्जदार कलम १४० अन्वये अंतरिम नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहे आणि सामनेवाला हा मालक असल्याने सदर नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

**आ दे श**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला याने नुकसान भरपाई म्हणून रक्कम रुपये २५,०००/- (रु. पंचविस हजार फक्त) या आदेशापासून ३० दिवसांचे आत अर्जदाराला रेखांकित धनादेशाद्वारे देण्यात यावी. सदरहू रक्कम मुदतीत न दिल्यास त्यावर अर्ज दाखल तारखेपासून संपूर्ण रक्कम फिटेपर्यंत द.सा.द.शे. ७.५ टक्के दराने व्याज देण्यास सामनेवाला जबाबदार राहील.

३. येणेप्रमाणे अंतरिम निवाडा करण्यात यावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Rajendra Dattaram Sawant
Date: 2019.10.01 11:39:11 +0530

सातारा
दिनांकः ३०/०९/२०१९

(राजेंद्र द. सावंत)
अध्यक्ष, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
सातारा.